ISSN : 2278-9308
October, 2022

# महाराष्ट्रातील आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक

प्रा.मिलिंद व्यंकटी घाडगे

पी.एन.पी. महाविद्यालय,अलिबाग जि.रायगड. ,मो.९१३०१४९४८६ , milind.ghadge28@gmail.com

**प्रस्तावना:-** महाराष्ट्राच्या इतिहासामध्येच नाही तर अवघ्या भारताच्या इतिहासामध्ये आद्य क्रांतिकारक म्हणून उमाजी नाईक यांचा विचार करावा लागतो, कारण महाराष्ट्रामध्ये 1818 ला मराठी सत्तेचा शेवट झाला आणि इंग्रजांनी महाराष्ट्रामध्ये आपले राजकीय वर्चस्व निर्माण केले. दुसरा बाजीराव पेशवा याने मराठ्यांचे राज्य स्वतःहून इंग्रजांच्या स्वाधीन केले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे राज्य अत्यंत मेहनतीने अनेक कठीण प्रसंगांमधून मार्ग काढून स्थापन केले होते पण या मराठ्यांच्या राज्याची धूळधाण उडवण्याचे काम पेशव्यांनी केले आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे रयतेचे राजे हे नष्ट केले.

इ स 1818 ला महाराष्ट्रात इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्यानंतर इंग्रजांना विरोध करणारा असा महाराष्ट्रामध्ये कोणीही सामर्थ्यवान नव्हता अशा वेळी उमाजी नाईक यांनी स्वतःची तुकडी बनवून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. महाराष्ट्रामध्ये इंग्रजांना सुरुवातीला विरोध करणारा क्रांतिकारक म्हणून उमाजी नाईक यांची ओळख निश्चितच मान्य करावी लागेल हे ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध होते.

**शोधनिबंधाची गृहीतके:-**

१) आद्य क्रांतिकारक म्हणून उमाजी नाईककडे इतिहासकारांनी म्हणावे तेवढे लक्ष दिले नाही.
२) दुर्लक्षित समाजातील असल्यामुळे उमाजी नाईकला न्याय मिळाला नाही.
३) उमाजी नाईकने सर्वप्रथम महाराष्ट्रात इंग्रजांच्या विरोधात लढा दिला.
४) छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा वारस म्हणून उमाजी नाईकचे कार्य.
५) उमाजी नाईकचे निर्भीड आणि कर्तृत्ववान नेतृत्व होते.
६) उमाजी नाईकच्या नेतृत्वाने इंग्रजांची सत्ता हादरून गेली.
७) तत्कालीन समाज व्यवस्थेने उमाजी नाईकचा खरा इतिहास समजून घेतला नाही.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:-**

१) महाराष्ट्रातील आद्य क्रांतिकारक म्हणून उमाजी नाईक यांच्या कार्याचा अभ्यास करणे.
२) छत्रपती शिवाजी महाराजांचा वारस म्हणून उमाजी नाईकचा चिकित्सक अभ्यास करणे.
३) ब्रिटिश शासनाला उमाजी नाईकने केलेल्या प्रतिकारचा अभ्यास करणे.
४) उमाजी नाईकच्या देशप्रेमाचा अभ्यास करणे.
५) उमाजी नाईकच्या कर्तुत्ववान नेतृत्वाचा चकित्सक अभ्यास करणे.
६) महाराष्ट्राच्या इतिहासातील उमाजी नाईक यांची भूमिका स्पष्ट करणे.
७) इंग्रजांच्या विरोधातील रणझुंजार व्यक्तिमत्व म्हणून उमाजी नाईकचा अभ्यास करणे.

**महाराष्ट्रातील आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक :-**

1757 ते 1857 हा कालखंड भारताच्या इतिहासामध्ये इंग्रजांचा एक प्रभावी आणि वर्चस्वाखाली असलेला कालखंड म्हणून ओळखला जातो कारण इंग्रजांनी या कालखंडामध्ये भारतामध्ये आपली सत्ता स्थापन करून मजबूत केली होती. इस 1818 मध्ये इंग्रजांनी मराठ्यांचा शेवट करून दुसऱ्या बाजीराव पेशव्याकडून महाराष्ट्राची सत्ता

काबीज केली होती, आणि तत्कालीन कालखंडाचा विचार जर केला तर महाराष्ट्रामध्ये इंग्रजांचे वर्चस्व वाढले होते आणि इंग्रजांच्या विरोधात लढा देण्याचे कोणीही धैर्य करत नव्हते असेच जर इंग्रजांचे वर्चस्व आणि अन्याय अत्याचार महाराष्ट्रामध्ये वाढला तर महाराष्ट्राची परिस्थिती एक दिवस अत्यंत वाईट होईल हे सर्वकाही ओळखून इंग्रजांच्या विरोधात लढा देण्याचे सर्वप्रथम महत्वाचे कार्य उमाजी नाईक यांनी केले. म्हणून उमाजी नाईक यांना महाराष्ट्रातील आद्य क्रांतिकारक म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**इंग्रजांच्या विरोधात उमाजी नाईकचा लढा:-**

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जर बघितला तर छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिवासी लोकांना आणि जनतेला आपल्या जवळ केलेले होते.

ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रामध्ये स्थापन झाल्यापासून ब्रिटिशांच्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात उमाजी नाईक यांनी सर्वप्रथम आपल्या समर्थकांना सोबत घेऊन इंग्रजांच्या विरोधात 1820 पासून झुंजार लढा द्यायला सुरुवात केली. यामध्ये इंग्रजांनी उमाजी नाईक यांचे बंड थांबवण्याचा सुरुवातीला अयशस्वी प्रयत्न केला परंतु याला इंग्रजांना यश आले नाही.

इंग्रजांनी उमाजी नाईक यांना बंदिस्त करण्यासाठी फोडा आणि झोडा ही नीती वापरली परंतु याचाही फायदा झाला नाही. याउलट उमाजी नाईक यांनी आपल्या तुकड्या मजबूत करून इंग्रजांना विरोध केला आणि इंग्रजांचे सर्व लढे हाणून पाडले.

**इंग्रजांनी उमाजी नाईकला पकडण्यासाठी बक्षीस ठेवले:-**

उमाजी नाईकच्या कारवाया बंद करण्यासाठी आणि उमाजी नाईकला पकडण्यासाठी इंग्रजांनी सर्वतोपरी प्रयत्न केले परंतु उमाजी नाईक यांचा जोर वाढतच होता त्यामुळे इंग्रजांनी उमाजीला पकडण्यासाठी मोठ्या प्रमाणात बक्षीस म्हणून रक्कम जाहीर केली यावरून उमाजी नाईक यांची निर्भिड आणि देशप्रेमाची भूमिका दिसून येते.

उमाजी नाईक आपल्या जाळ्यामध्ये येत नाही असे समजल्यावर इंग्रजांनी उमाजी नाईकला पकडून देणाऱ्यास अजून मोठी रक्कम जाहीर केली, परंतु याला न घाबरता उमाजीने इंग्रजांच्या विरोधात लढा देण्यास चालूच ठेवले आणि इंग्रजांच्या एक एक अधिकाऱ्यास यमसदनी पाठवले. या सर्व गोष्टींमुळे इंग्रजांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते आणि याचाच बदला घेण्यासाठी इंग्रजांनी कूटनीती आखून उमाजी नाईकला पकडण्याचा ठरवले.

**उमाजी नाईकचा मृत्यू:-**

सर्वतोपरी प्रयत्न करूनही उमाजी आपल्या हाती येत नाही, आणि आपल्याला शरण जात नाही असे समजल्यावर इंग्रजांनी उमाजी नाईकला फसवून पकडण्याचे ठरवले. समोरासमोर उमाजी नाईक आपल्यासमोर शरणागती पत्करणार नाही हे इंग्रजांनी ओळखून सोडले होते म्हणून इंग्रजांनी कपटनीतीने उमाजीच्या बायकोला आणि मुलांना पकडले आपल्या कुटुंबाला इंग्रजांनी पकडले असल्यामुळे उमाजींनी इंग्रजांना शरण जाण्याचे ठरवले. आणि याच संधीचा फायदा घेत इंग्रजांनी उमाजी नाईक यांना १८३२ झाली फासावर लटकावले. अशा या महान क्रांतिकारकाचा मृत्यू झाल्यामुळे महाराष्ट्राचे खूप मोठे नुकसान झाले.

**निष्कर्ष:-**

एकोणिसाव्या शतकामधील इंग्रजांना विरोध करणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा वारस म्हणून उमाजी नाईक यांची ओळख आहे. इंग्रजांच्या अन्याय अत्याचारी धोरणाला विरोध करणारा सर्वप्रथम महाराष्ट्रातील देशप्रेमी आणि क्रांतिकारक म्हणून बहुजन समाजातील उमाजी नाईक यांचे नाव अग्रगण्य आहे. परंतु तत्कालीन

कालखंडातील समाज व्यवस्थेने उमाजी नाईक यांच्या कार्याकडे दुर्लक्ष केले ही महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

**संदर्भसूची :-**

१) डॉ.काठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर औरंगाबाद.
२) गाठाळ एस एस, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद.
३) मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के एस पब्लिकेशन पुणे.
४) पाटील व्ही, महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास, सागर प्रकाशन पुणे.
५) पवार जयसिंगराव, आधुनिक भारताचा इतिहास.
६) आचार्य धनंजय, आधुनिक भारताचा इतिहास.